ईद मुबारक

लेखक
डॉ. सय्यद रफीक
एम.बी.बी.एस.

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे."

हिजरी वर्षातील शाबान या आठव्या महिन्याच्या शेवटच्या तारखेला सूर्यास्तानंतर पश्चिमेला चंद्रदर्शनाने रमजान या पवित्र महिन्याची सुरूवात होते. जगातील समस्त मुस्लिम बांधव अगोदरपासूनच रमजानची आतूरतेने वाट पाहात असतात. जीवनात पुन्हा एकदा हा पवित्र महिना लाभावा अशीच प्रत्येकाची इच्छा असते. त्यामुळे जीवनात पुन्हा एकदा रमजानच्या चंद्राचे दर्शन करताना समस्त आबालवृद्ध व माता-भगिनी हर्षोल्हासाने भारावून जातात व कृतज्ञतेने दुआ करतात,

"अल्लाहु अकबर! अल्लाहुम्मा अहिल्लहू अलैना बिल् अम्नि वल् ईमान वस्सलामति वल् इस्लाम वत्तौफीकि लिमा तुहिब्बु व तरदा रब्बुना व रब्बुकल्लाहु!"

हीच दुआ पैगंबर मुहम्मद (स.) करत असत, जिचा अर्थ खालीलप्रमाणे आहे–

"हे अल्लाह! तू श्रेष्ठतम आहेस. हे स्वामी! हा चंद्र समस्त मानवजातीसाठी सुखसमृद्धीचा ठरो! सर्वांना सलामती व शांती लाभो! तुला प्रिय असलेली सत्कर्मे करण्याची सद्‌बुद्धी सर्वांना दे. हे चंद्रा, नि:शंक तुझा आणि आम्हा सर्वांचा स्वामी अल्लाहच आहे."

किती महान आहे ही दुआ! सकल मानवजातीच्या कल्याणाची, सुख-समृद्धीची, सलामतीची, शांतीची, सर्वांना सत्कर्मांची सद्‌बुद्धी लाभण्याची! या दुआचा शेवट किती वास्तव आहे. मुस्लिम का चंद्राची पूजा करतात? येथे तर स्पष्ट उल्लेख आहे की, "हे चंद्रा! नि:शंक तुझा आणि आम्हा सर्वांचाही निर्माता एकच आहे, अल्लाह!"

येथे हा उदात्त संदेश दिला आहे की निर्माता फक्त आणि फक्त एकच आहे - अल्लाह! बाकी सर्वच्या सर्व निर्मिती आहेत. केवळ निर्मात्याचीच भक्ती रास्त व अनिवार्य आहे. त्या एकाच निर्मात्याला सोडून निर्मित वस्तुंची भक्ती करणे कदापिही वैध अथवा रास्त नव्हे!

"जगामध्ये सुख-शांती नांदो" ही दुआ करणे रास्त आहेच, पण या दुआबरोबर दवासुद्धा तितकीच महत्त्वाची आहे. पैगंबरांनी फक्त दुआच केली नाही तर त्याबरोबर प्रयत्नांची पराकाष्ठादेखील केली. कठोर संघर्ष केला, पराकोटीचा त्याग केला. कोणतीही गोष्ट केवळ प्रार्थनेने प्राप्त होत नाही, तर त्यासाठी रास्त प्रयत्नही अनिवार्य असतात.

रमजान महिना एक आदर्श, चारित्र्यसंपन्न व संयमी कार्यकर्ता घडविण्याचे माध्यम आहे. प्रत्येक कार्यकर्ता जर आदर्श असेल. अशा आदर्श, चारित्र्यसंपन्न कार्यकर्त्यांचे मजबूत संघटन असेल आणि या आदर्श संघटनाला पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यासारखे महान नेतृत्व लाभले असेल तर "जगामध्ये शांती, सद्‌भावना व सुख-समृद्धी नांदावी." ही दुआ सार्थ ठरल्याशिवाय राहणार नाही.

रमजान महिन्याचे वैशिष्ट्य हे आहे की याच महिन्यात पवित्र कुरआनचे अवतरण झाले. 'लैललुल् कद्र' अथवा 'शबेकद्र' ही रमजानमधील एक पवित्र रात्र आहे. याच रात्री समस्त मानवजातीला कल्याणाचा मार्ग दाखविणारा उदात्त कुरआन अल्लाहकडून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर अवतरित झाला.

ईशग्रंथ व पैगंबर हा मानवजातीचा प्राचीनतम व अनमोल ठेवा आहे. म्हणूनच मुस्लिमांसाठी फक्त कुरआनवर व पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावरच नव्हे तर समस्त ईशग्रंथ व तमाम पैगंबरांवर श्रद्धा बाळगणे अनिवार्य आहे. ईशग्रंथ अनेक आहेत आणि पैगंबरही अनेक आहेत. पवित्र कुरआनसह इंजिल, तौरात, जबूर इ. ईशग्रंथांचे अवतरणसुद्धा पवित्र रमजानमध्येच झाले आहे. तद्‌वतच आदम (अ.) या प्रथम पैगंबरांसह नूह (अ.), इब्राहीम (अ.), याकूब (अ.), मूसा (अ.), हारून (अ.), इसा (अ.) इ. अनेक पैगंबर मानवी इतिहासात झाले आहेत. या सर्व ईशग्रंथांचा व साहजिकच समस्त पैगंबरांचा संदेश वेगवेगळा नव्हे तर एकच होता. मात्र तत्कालीन पैगंबरांच्या पश्चात त्या ईशग्रंथांमध्ये काही स्वार्थी व भ्रष्ट लोकांनी हेतूपुरस्सर भेसळ करून त्या ईशग्रंथांना विकृत केले. ईशग्रंथ कुरआन हा पूर्वीच्या तमाम ईशग्रंथांची अंतिम आवृत्ती असून आजतागायत त्यात कोणीही कसलीही भेसळ करू शकले नाही व भविष्यातही ते शक्य नाही. कुरआनची सुरक्षा ही अल्लाहची खास कृपा आहे. तद्‌वतच शेवटचे पैगंबर

मुहम्मद (स.) यांच्या पूर्वीच्या पैगंबरांच्या इतिहासातही काही स्वार्थी लोकांनी हेतूपुरस्सर ढवळाढवळ केली, परिणामी त्यांचा संदेश विकृत झाला. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कथनानुसार जगात जवळपास १,२४,००० पैगंबर होऊन गेले. मात्र या सर्व पैगंबरांपैकी केवळ पैगंबर मुहम्मद (स.) याचेच चरित्र व संदेश मूळ स्वरूपात आजही सुरक्षित आहे.

रमजान महिन्यात दिव्य कुरआनचे अवतरण झाल्यामुळे या संपूर्ण महिन्यात रोजा (उपवास) ठेवून समस्त मुस्लिम बांधव अल्लाहची कृतज्ञता व्यक्त करतात. तद्‌वतच रमजान महिन्यात कुरआनचे अधिकाधिक अध्ययन केले जाते. रमजान महिन्यात रात्रीच्या विशेष नमाज (तरावीह) मध्ये संपूर्ण कुरआनचे पारायणही केले जाते.

पवित्र कुरआनचे अवतरण कोण्या खास वर्गाच्या, वर्णाच्या अथवा विशिष्ट देशातील लोकांसाठीच मर्यादित नसून समस्त मानवजातीच्या कल्याणासाठी आहे. म्हणूनच कुरआनात आहे,

"रमजान महिन्यामध्ये कुरआनचे अवतरण झाले मानवजातीकरिता मार्गदर्शन व मार्गदर्शनाच्या सुस्पष्ट पुराव्यांनी समाविष्ट सत्य व असत्याची कसोटी."
(दिव्य कुरआन-२:१८५)

'माणूस' हाच कुरआनच्या केंद्रस्थानी असून मानवजातीचा वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, भौतिक, आर्थिक, राजकीय इ. सर्वांगीण विकास हाच कुरआनचा मूलभूत विषय आहे. कुरआनातील शिकवणी माणसाला ऐहिक जीवनात सुख, शांती व समृद्धी प्रदान करणाऱ्या आहेतच, पण याच मौलिक शिकवणींना अंगीकारून माणूस पारलौकिक अर्थात मरणोत्तर जीवनातही शाश्वत यशाचा मानकरी होऊ शकतो. माणसाचे सद्य ऐहिक जीवन जेवढे निकोप, निरामय, नीतिवान असेल तेवढे त्याला मरणोत्तर जीवनातही सुख-समाधान लाभेल, याबाबतीत कुरआन अधिक जोर देतो. म्हणजेच ऐहिक जीवन जर कोणी सन्मार्गाने, न्यायाने, नीतीने, समतेने व बंधुभावाने जगत असेल तरच त्याला मृत्यूपश्चातही मुक्ती, मोक्ष वा चिरशांती लाभेल. हे कुरआनचे समीकरण मानवाच्या ऐहिक व पारलौकिक जीवनाचे परस्पर घनिष्ट नाते स्पष्टपणे विशद

करणारे आहे.

सामाजिक एकात्मता हा आदर्श समाजाचा पाया आहे.

"सकल चराचर सृष्टीचा स्वामी फक्त आणि फक्त एकच अल्लाह आहे. साहजिकच, आपण सर्व एकाच अल्लाहची निर्मिती आहोत."

ही कुरआनची भूमिका समस्त मानवजातीमध्ये ऐक्य निर्माण करण्यासाठी प्रेरणादायी ठरते. त्याचबरोबर देवाधर्माच्या नावावर समाजात प्रचलित असलेल्या तमाम अंधश्रद्धा व अनिष्ट प्रथांना पायबंद बसतो. देवाधर्माच्या नावे चालणारी सर्वसामान्यांची लूट क्षणात संपुष्टात येते.

इस्लाम खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याचा खंदा समर्थक असून माणसाला गुलामीतून मुक्त करण्याबाबत त्याची आग्रही भूमिका आहे.

स्वातंत्र्य :

मानवजातीच्या सर्व समस्यांचे मूळ कारण 'माणसांवर माणसांची गुलामी' हेच आहे. मानवी इतिहासात जेवढे पैगंबर आले, त्या सर्वांचा एक महत्त्वाचा उद्देश तत्कालीन समाजाला गुलामीतून मुक्त करणे व खरेखुरे स्वातंत्र्य बहाल करणे हा होता. कुरआनात आहे,

"पैगंबर लोकांना सदाचाराची आज्ञा देतात, दुराचारापासून रोखतात, हितकारक गोष्टींना वैध करतात व बाधक गोष्टींना निषिद्ध करतात आणि लोकांना त्या अवजड ओझ्यातून मुक्त करतात जे त्यांच्यावर लादलेले आहे आणि त्या बंधनातून मुक्त करतात ज्यांच्यात ते जखडलेले आहेत." (दिव्य कुरआन)

इस्लामच्या मूलभूत तत्त्वांपैकी 'जकात' हे धनवानांसाठी अनिवार्य कर्तव्य आहे. जकातची ही रक्कम एकत्रित करून सामुदायिकरित्या खर्च करावी, असा आदेश कुरआन देतो. जकातीच्या विनियोगाबद्दल कुरआनात स्पष्ट म्हटले आहे,

"जकातचा माल गोरगरीबांसाठी, जकात वसुलीवर नियुक्त असलेल्या लोकांसाठी, विरोधकांच्या प्रबोधनासाठी, गुलामांना गुलामीतून मुक्त करण्यासाठी, कर्जदारांना कर्जातून मुक्त करण्यासाठी, सन्मार्गात खर्च करण्यासाठी आणि आडल्यानडलेल्या प्रवाशांसाठी आहे. जकात अल्लाहने अनिवार्य केलेले कर्तव्य

आहे. तो सर्व काही जाणणारा व दूरदर्शी आहे.'' (दिव्य कुरआन)

सदाचाराची व्याख्या करताना कुरआनात म्हटले आहे,

“सदाचार हा नव्हे की तुम्ही आपले तोंड पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे करावे. तर सदाचार हा आहे की जे अल्लाहवर, अंतिम दिवसावर ईमान धारण करतात, तसेच सर्व दूतांवर, सर्व ग्रंथ आणि सर्व पैगंबरांवर ईमान धारण करतात. अल्लाहच्या प्रेमापोटी आपल्याला प्रिय असलेली संपत्ती आपले नातेवाईक आणि अनाथ, गरजवंत, वाटसरू व याचना करणारे, तसेच गुलामांच्या मुक्ततेसाठी खर्च करतात आणि नमाज कायम करतात व जकात अदा करतात. तसेच दिलेल्या वचनांची पूर्तता करतात आणि अडचणी, संकटे आणि युद्धप्रसंगीदेखील संयम राखतात. हेच लोक सत्यशील आणि अल्लाहचे भय बाळगणारे आहेत.''

(दिव्य कुरआन-२:१७७)

राष्ट्रप्रमुख उमर (र.) यांच्या कारकीर्दित यमन प्रदेशातील एक घटना फार फार महत्त्वाची आहे. तेथील गव्हर्नरच्या तरुण मुलाबरोबर एका सामान्य खेडूत मुलाची घोड्याची शर्यत लागते. सामान्य खेडूत जिंकतो. हरल्याच्या रागाने गव्हर्नरपुत्र त्या सामान्याला सर्वदेखत चाबकाने बदडतो व तो बिचारा मुकाटपणे सहन करतो. नंतर तो पीडित राष्ट्रप्रमुख उमर (र.) यांच्याकडे जाऊन तक्रार करतो. खलीफा उमर (र.) गव्हर्नरला आपल्या चिरंजीवासह हजप्रसंगी मक्का येथे उपस्थित राहण्याचा आदेश काढतात. गव्हर्नर आपल्या मुलासह हजर आहे. पीडितही उपस्थित आहे. काबागृहासमोर राष्ट्रप्रमुख त्या पीडिताच्या हाती चाबूक (हंटर) देतात. हजसाठी जमलेला प्रचंड जनसमुदायही हजर आहे.

राष्ट्रप्रमुख उमर (र.) पीडिताला आज्ञा करतात, “बेटा, जेवढे फटके या गर्विष्ठाने तुला मारलेत, तेवढेच आता याच्या बापासमोर त्याला मार!''

आदरणीय राष्ट्रप्रमुख उमर (र.) यांनी त्या गव्हर्नरला उद्देशून म्हटले, “गव्हर्नरसाहेब! अल्लाहने प्रत्येक माणसाला त्याच्या आईच्या कुशीतून स्वातंत्र्यासह जन्माला घातले आहे. हे मानवी स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा अधिकार तुम्हाला कोणी आणि कधी दिला?''

धन्य ते खलीफा उमर (र.)! धन्य तो इस्लाम! धन्य तो न्याय!

स्वातंत्र्य प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे. तो मिळवून देण्यासाठीच पैगंबर, कुरआन व इस्लाम आहे. अगदी धर्माच्या बाबतीतही इस्लाममध्ये जोरजबरदस्ती नाही. आपल्या सद्सद्विवेक बुद्धीनुसार हवे ते विचार स्वीकारण्याचा, अनुसरण्याचा आणि त्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्याचा मूलभूत अधिकार इस्लामने प्रत्येकाला बहाल केला आहे.

जनसामान्यांना गुलाम बनविण्यासाठी धूर्त-कावेबाज लोकांनी अनादीकाळापासून प्रामुख्याने थोतांड देवाधर्माचा आधार घेतलेला आहे. लोकांना या कपोलपल्पित देवादिकांची भुरळ घालायची आणि स्वत:ला मात्र त्या देवीदेवतांचे एजंट घोषित करायचे. अशा प्रकारे या पुरोहितांनी व मुजावरांनी देवाधर्माच्या नावावर धंदाच उभा केला. जनसामान्यांच्या या अमाप लुटीचा अंदाज देवस्थानांच्या प्रचंड मालमत्तेवरून करता येईल.

इस्लामने या सर्व अंदाधुंदीच्या मुळावरच घाव घातला. खऱ्या देवाची, जो एकमेव निर्माता, एकमात्र शासक, मालक व पुज्य आहे; त्याची जनसामान्यांना ओळख करून दिली. स्वार्थी व लबाड लोकांनी ईश्वराकडे जाणाऱ्या रस्त्यावर जे भ्रामक अडथळे निर्माण केले होते ते उद्ध्वस्त केले व जनसामान्यांचा संबंध ईश्वराशी थेट जोडून दिला. ईश्वराचा कोणी एजंट वा मध्यस्ती नाही. तुम्ही सारे तेथे जा. तेथे कोणाला जादा अधिकार नाहीत.

याच एकमेव अल्लाहला जोतिराव फुलेंनी 'निर्मिक' संबोधले आहे व संत तुकारामांनी आपल्या अभंगात 'अल्लह', 'देव' हा शब्दप्रयोग केला आहे. तात्पर्य हे की देवाधर्माच्या नावाखाली प्रचलित असलेल्या गुलामगिरीतून लोकांना मुक्त करण्यासाठी मूर्तिपूजा व तत्सम भोंदूगिरीतून लोकांना मुक्त करणे अनिवार्य आहे.

अल्लाहने प्रत्येक माणसाला त्याच्या आईच्या कुशीतून स्वातंत्र्यासह जन्माला घातले आहे. मानवी स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा काडीमात्र अधिकार कोणालाही नाही. ही कुरआनची शिकवण मानवी स्वातंत्र्यासाठी अत्यंत पोषक आहे. कुरआनच्या याच तत्त्वाच्या आधारे पैगंबरांनी तत्कालीन समाजाला समस्त गुलामगिरीतून मुक्त करून खरेखुरे स्वातंत्र्य बहाल केले होते आणि आजही ते शक्य आहे.

सारी मानवजात एकाच मातापित्याची संतान असल्यामुळे सर्व समान आहेत व बंधू-भगिनी आहेत. हे वास्तव अधोरेखित करणाऱ्या अनेक आयतींपैकी कुरआनातील ही आयत फार फार मोलाची आहे,

"लोकांनो, आम्ही तुम्हाला एकाच पुरुष व एकाच स्त्रीपासून निर्माण केले, मग तुमच्या भावक्या, बिरादऱ्या व कबिले बनविले, जेणेकरून तुम्ही एक दुसऱ्यांना ओळखावे, नि:शंक तुम्हापैकी श्रेष्ठ तो आहे जो सर्वाधिक ईशभीरू व शीलवंत असेल." (दिव्य कुरआन)

पैगंबर मुहम्मद (स.) आपल्या अंतिम हजप्रसंगी समस्त मानवजातीला उद्देशून म्हणाले,

"लोकांनो, खबरदार! सदैव लक्षात ठेवा की कोणाही अरबवासीयाला कोणा अरबेतरावर प्राधान्य नाही, तद्वतच कोणा अरबेतराला कोणा अरबवासीयावर प्राधान्य नाही. कोणा गोऱ्याला कोणा काळ्यावर प्राधान्य नाही व कोणा काळ्याला कोणा गोऱ्यावर प्राधान्य नाही. तुम्ही सर्व आदम (अ.) पासून आहात आणि अल्लाहने आदम (अ.) यांना मातीपासून निर्माण केले. तुम्हापैकी अल्लाहजवळ श्रेष्ठ तो आहे जो तकवा अर्थात ईशभय बाळगण्याच्या बाबतीत श्रेष्ठ आहे."

अर्थातच माणसाचे मोठेपण त्याच्या भौगोलिक प्रदेशावर किंवा वर्णावर, वंशावर अवलंबून नसून त्याच्या तकव्यावर म्हणजेच आचारविचारांवर, शीलावर, चारित्र्यसंपन्नतेवर अवलंबून आहे. ज्या समाजमनावर कुरआनची ही शिकवण बिंबलेली असेल तेथेच समता आणि बंधुता प्रत्यक्ष कृतीत उतरलेली दिसेल.

न्याय तर कुरआनचा आत्मा आहे.

"नि:शंक अल्लाह तुम्हाला न्यायाची ताकीद करतो."

हा कुरआनचा आदेश आहे. स्वत:च्या बाबतीतही न्याय करा. घरातही न्यायाने वागा. समाजातही न्याय प्रस्थापित करा आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात न्यायच करा. अगदी तुमच्या कट्टर वैऱ्याशीसुद्धा न्यायानेच वागा. जगातील समस्त पैगंबर न्याय प्रस्थापित करण्यासाठीच आले होते.

"सदैव न्यायाचे समर्थक व्हा, अन्याय करणाऱ्यांना अल्लाह कदापि

पसंत करीत नाही, न्याय करणारेच अल्लाहला पसंत आहेत.''

या कुरआनच्या शिकवणी न्यायाची महत्ता विशद करणाऱ्या आहेत.

अशा प्रकारे कुरआनातील शिकवणींच्या आधारे आपण एक असा आदर्श समाज घडवू शकतो ज्यात स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्याय प्रत्यक्षात साकारलेला असेल.

''एकही सफ में खड़े हो गये महमूद व आयाज़!
न कोई बंदा रहा और न कोई बंदा नवाज़!
साहिब व मुहताज व ग़नी एक हुए!
तेरी सरकार में पहुंचे तो सभी एक हुए!'' (महाकवि इकबाल (रह.))

पवित्र कुरआनात अर्थकारणाविषयीचे मार्गदर्शन अत्यंत प्रभावी व मोलाचे आहे. एकीकडे कुरआन व्याज देण्याघेण्याला निषिद्ध (हराम) ठरवितो तर दुसरीकडे धनवानांवर जकात अनिवार्य ठरवतो. लाखो शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दिवसेंदिवस गरीब व श्रीमंतामधील वाढत चाललेली दरी ही व्याजाधिष्ठित अर्थव्यवस्थेची कटू फळे आहेत.

शिक्षणाविषयी कुरआनचे मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे. पुरुषांबरोबर स्त्रियांवरही व मुलांबरोबरच मुलींवरही शिक्षण अनिवार्य ठरविणारा कुरआन हा पहिला ग्रंथ आहे.

''अफला यतदब्बरून'' - तुम्ही चिंतन का करत नाही?
''अफला तूबसिरून'' - तुम्हाला दिसत नाही काय?
''अफला ताकिलून'' - तुम्हाला अक्कल नाही काय?

अशा अनेक आयती कुरआनचा वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्ट करतात. त्यामुळेच अब्बास इब्ने किरतास (इ.स. ८१० ते ८८७) हा जगातील पहिले उड्डाण करणारा शास्त्रज्ञ, मुहम्मद इब्ने मूसा अल् खुबारियो हा बीजगणिताचा (अलजिब्रा) जनक, अल जहरावी (इ.स. ९३६ ते १०१३) हा महान शस्त्रक्रियाविषारद व वैद्यकीय शास्त्रज्ञ, जाबिर बिन हय्यान (इ.स. ७२१ ते ८१५) हा रसायनशास्त्राचा जनक (The Father of Chemistry), इब्ने सीना (ॲबिसीना) (इ.स. ९८० ते १०८७) हा फादर ऑफ मॉडर्न मेडिसिन, अबू

अल हसन इब्ने हशीम (इ.स. ९६५ ते १०३९) हा नेत्रशास्त्राचा आद्यप्रवर्तक (Pioneer in Opticals), अबू बकर बूजजानी (इ.स. ९४० ते ९९८) हा खगोलशास्त्रज्ञ व गणिततज्ज्ञ, अल राजी (इ.स. ८६५ ते ९२५) चे रसायनशास्त्र व वैद्यकीय क्षेत्रात महान योगदान (ॲलर्जी वैद्यकीय शब्द अल राजीचेच इंग्रजीकरण आहे), अल इद्रीसी हा जगातील पहिला नकाशाकार (इ.स. १०० ते ११६६) (पृथ्वी गोल आहे हे सिद्ध करून चांदीच्या मोठ्या तबकावर पृथ्वीचा नकाशा तयार केला), अब बेरूनी (इ.स. ९७३ ते १०५०) याने तत्त्वज्ञान, इतिहास, भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र, गणित, भूगर्भशास्त्र व औषधीशास्त्र इ. विषयांवर १२० पेक्षा अधिक ग्रंथ लिहिले. 'तारीख अल हिंद' हा भारतीय संस्कृती व इतिहासावरील त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ आहे. त्यानेच पहिल्यांदा पृथ्वीगोलाची मोजणी केली. त्यानुसार पृथ्वीची त्रिज्या ३९३९ मैल तर परिघ २४७७८.०५ मैल आहे. मुहम्मद कफीर फरगानी (जन्म इ.स. ८६३) घड्याळ व होकायंत्राचा निर्माता होय. अशा अनेक तत्त्ववेत्त्यांचा, वैज्ञानिकांचा उदय झाला तो कुरआनने दिलेल्या ज्ञानाच्या अधिष्ठानामुळेच.

दिव्य कुरआनचे मार्गदर्शन जीवनव्यापी आहे. परिपूर्ण आहे. मात्र मानवी जीवनाच्या उद्देशांविषयी कुरआचे मार्गदर्शन सद्य चंगळवादी, भोगवादी पिढीसाठी खूप खूप मोलाचे आहे. ही दुनिया अंधेरनगरीही नाही व मोकाट चरण्यासाठीचे कुरणही नाही. उलट ही दुनिया परीक्षागृह असून मृत्यू अटळ आहे व तो येताच प्रत्येकाला या दुनियेच्या परीक्षागृहातून बाहेर जावे लागेल. या विश्वाचाही ठराविक अवधीनंतर अंत होईल. तत्पश्चात समस्त मानवजातीला मृत्यूपश्चात पुन्हा जिवंत केले जाईल व ऐहिक जीवनात केलेल्या कर्मानुसार प्रत्येकाचा न्यायनिवाडा होईल. सज्जनांना जन्नत (स्वर्ग) रूपी महान इनाम प्रदान केले जाईल. तर भ्रष्टाचाऱ्यांना, बेइमानांना जहन्नम (नरक) रूपी कठोर शासन केले जाईल. मृत्युपश्चात जीवन आहे आणि तेच शाश्वत जीवन आहे, हे वास्तव कुरआन पुन्हा पुन्हा मानवजातीसमोर सप्रमाण विशद करतो. मृत्यू आला, तफन केले, शरीराची माती झाली अथवा राख झाली म्हणजे तुझा अंत नव्हे! मातीच्या, राखेच्या पलीकडेही जीवन आहे. मात्र मृत्यूपलीकडच्या जीवनातील शाश्वत यशासाठी तुझी आजची भूमिका अत्यंत महत्त्वाची व निर्णायक

ठरणारी आहे. आज तुला आचारविचारांचे स्वातंत्र्य आहे. समतेने, बंधुभावाने, न्यायाने, नीतीने जगण्याचे स्वातंत्र्य आहे अथवा विषमतेने, द्वेषाने, अन्याय व अनीतीने जगण्याचेही स्वातंत्र्य आहे. दोन्ही मार्गांच्या परिणामांविषयी सावधान करण्यासाठी सुरूवातीपासून पैगंबरही आले आहेत.

आता अंतिम निर्णय तुझा तुलाच घ्यावयाचा आहे. कुरआनमध्ये अल्लाह फर्मावतो,

"तुम्हाला झाले तरी काय? काय आम्ही सन्मार्गीयांचा आणि दुष्टांचा अंतिम परिणाम एकसारखाच करू? कदापि नव्हे!" (दिव्य कुरआन)

पैगंबर मुहम्मद (स.) म्हणतात, "ही दुनिया मरणोत्तर दुनियेची (आखिरतची) शेती आहे. अर्थात सद्य जीवनात तुला पेरण्याचे, मेहनत-मशागतीचे म्हणजेच कर्माचे स्वातंत्र्य आहे. मात्र याद राख की जे आज (सद्य जीवनात) पेरशील तेच पीक उद्या (मरणोत्तर जीवनात) तुझ्या वाट्याला येईल. या जगातील प्रत्येक माणूस आपल्या उभ्या जीवनातील कर्मासंबंधी अल्लाहसमोर उत्तरदायी आहे. प्रत्येकाला अल्लाहसमोर आपल्या प्रत्येक कर्मासंबंधी जाब द्यावाच लागेल. प्रत्येकाची गाठ शेवटी अल्लाहशीच आहे."

याचे भान वारंवार कुरआन करून देतो. ही उत्तरदायित्वाची जाणीव मन-मस्तिष्कात बिंबली की मग माणूस रात्रीच्या काळोखातही अन्याय, अत्याचार करण्याचे धाडस करू शकत नाही. "अल्लाह सदासर्वदा मला पाहात आहे" ही जाणीव त्याच्या मनातच एक पोलीस चौकी निर्माण करते. त्यामुळेच राष्ट्रप्रमुख माननीय उमर बिन अब्दुल अजीज (रह.) आपल्या घरात दोन दिवे ठेवत रात्री उशिरापर्यंत शासकीय कामकाज करताना एक दिवा वापरत आणि शासकीय कामकाज संपल्यावर तो दिवा विझवून दुसरा दिवा पेटवत.

हा प्रकार पाहून एका सद्‌गृहस्थाने आश्चर्याने त्यांना प्रश्न केला, "महाराज, एक दिवा विझवता आणि दुसरा पेटवता, ही काय भानगड आहे?"

त्यावर उमर बिन अब्दुल अजीज (रह.) उत्तरले, "मित्रा! हा शासकीय दिवा आहे. शासकीय काम करेपर्यंत तो वापरतो. सरकारी काम संपल्यावर माझा खाजगी दिवा वापरतो. राष्ट्रप्रमुख असलो तरी मृत्यू का मला चुकणार

आहे? आणि आज जर खाजगी जीवनासाठी सरकारी तेलावर जळणारा दिवा वापरला तर उद्या उमर अल्लाहला काय तोंड दाखवील रे?''

धन्य ते उमर बिन अब्दुल अजीज! (रह.) धन्य ते खलीफा! उत्तरदायित्वाच्या जाणिवेने रात्रीच्या अंधारातही सरकारी तेल स्वत:साठी न जाळणारा राज्यकर्ता!

हीच जाणीव जर समाजातील प्रत्येक लहान-थोर व्यक्तीमध्ये निर्माण झाली तर तो समाज आणि तो देश किती महान असेल!

आदरणीय उमर बिन खत्ताब (र.) हे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे सोबती आणि इस्लामी राज्याचे दुसरे खलीफा (तत्कालीन राष्ट्रप्रमुख) सर्वज्ञात आहेत. एकदा प्रवासात असताना रानावनात शेळ्यांची राखण करणाऱ्या मुलाची परीक्षा घेण्यासाठी ते त्याच्या जवळ थांबले. मुलाचा परिचय करून घेतला मालकाचा गुलाम असून त्याच्या शेळ्यांची राखण करतो असे तो म्हणाला.

खलीफा उमर (र.) त्याला म्हणाले, "बेटा, एक शेळी मला दे. तिची किंमत मी तुला देतो. एक तर तुझा मालक शेळ्यांची गणतीच करणार नाही आणि जर चुकून त्याने शेळ्या मोजल्याच तर सांगून टाक की लांडगा घेऊन गेला. मी जीवाचं रान केलं, पण शेळी सोडविण्यात यश आलं नाही. अशा प्रकारे ही रक्कम तुला सहज लुबाडता येईल.''

तो गुलाम पूर्ण आत्मविश्वासाने उत्तरतो, "महाराज, मालकाला समजा फसवेन! पण अल्लाहचं काय? सरतेशेवटी गाठ तर त्याच्याशीच आहे.''

त्याचे हे उत्तर ऐकून खलीफा उमर (र.) यांचे उर आनंदाने भरून आले. ते उद्गारले, "अल्लाह! तुझी अनंत कृपा आहे! उमरच्या राज्यातील छोटी मुलंही अशी ईशपरायण व चारित्र्यसंपन्न आहेत.''

जैसा राजा तैसी प्रजा! नेता स्वत:च ईशभीरूतेचे महान प्रतीक होता. म्हणूनच प्रजाच काय, लहान मुलेसुद्धा अशी उदात्त चारित्र्याची होती. खरे तर रमजानच्या रोजांचा हाच उद्देश आहे. कुरआनात आहे,

"या अय्यूहल्लजीना आमनू कूतिब अलैकुमूस्सियामू कमा कूतिब अलल्लजीना मिन कब्लिकुम् लअल्लकूम तत्तकून्.''

अर्थात- "हे ईमानधारकांनो, तुम्हावर (रमजानचे) रोजे (उपवास) अनिवार्य आहेत, ज्याप्रमाणे पूर्वीच्या लोकांवर ते अनिवार्य होते. यास्तव की तमच्यात तकवा (ईशभीरूता) निर्माण व्हावा." (दिव्य कुरआन)

भल्या पहाटे फजरच्या नमाजच्या अजानपूर्वी सेहरी (न्याहरी) करून रोजाची सुरूवात होते.

"अल्लाहुम्मा असूमू गदल्लक फग्फिरली मा कद्दम्तू व मा अख्खरतू."

अर्थात- "हे अल्लाह, मी फक्त तुझ्याचसाठी हा रोजा ठेवत आहे. तू त्याचा स्वीकार कर व माझ्या तमाम पापांना (अपराधांना) क्षमा कर."

असा संकल्प करण्यात येतो. मग सूर्यास्तापर्यंत अन्नपाणी, पती-पत्नींचे समागम, अन्य दुष्कृत्ये वर्ज्य असतात. सूर्यास्तानंतर इफ्तार करतात. इफ्तार करताना दुआ करतात,

"अल्लाहुम्मा इन्नी लका सुमतू व बिका आमन्तू व अलैका तवक्कलतू व अला रिजकीका अफ्तरतू फतकब्बल् मिन्नी."

अर्थात- "हे अल्लाह, मी केवळ तुझ्याचसाठी रोजा ठेवला तुझ्यावरच माझे ईमान आहे आणि तुझ्यावरच भरोसा आहे. तू दिलेल्या कष्टाच्या कमाईनेच मी हा रोजा इफ्तार करत आहे. तू माझ्या रोजाचा स्वीकार कर."

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी म्हटले, "जो रोजा ठेवूनही खोटे बोलणे व खोटे वागणे सोडत नाही, त्याच्या निव्वळ उपासमारीची अल्लाहला काहीएक गरज नाही."

एकदा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी म्हटले, "रोजा म्हणजे केवळ पहाटेपासून ते सूर्यास्तापर्यंत अन्न-पाणी सोडणे नव्हे! रोजा जिव्हेचापण आहे, डोळ्यांचासुद्धा आहे, कानांचादेखील आहे आणि हातापायांचाही!"

खोटे बोलू नये, निंदानालस्ती करू नये हा जिव्हेचा रोजा आहे. वाईट नजरेने कुणाकडे पाहू नये हा डोळ्यांचा रोजा आहे. अश्लीलता, निंदानालस्ती, शिवीगाळ ऐकू नये हा कानांचा रोजा आहे.

थोर इस्लामी विचारवंत मौलाना मौदूदी (रह.) तकवाचे स्पष्टीकरण करताना दोन घोडेस्वारांचे उदाहरण देतात. पैकी एक तो आहे ज्याच्या हाती

घोड्याचा लगाम आहे व दुसरा तो आहे ज्याच्या हातून घोड्याचा लगाम सुटलेला आहे. लगाम हाती असलेला घोडेस्वार आपल्या इच्छेनुसार हवे तिकडे घोडा नेईल. मात्र लगाम हातून सुटलेला घोडेस्वार स्वत:च घोड्याच्या अधीन असल्यामुळे घोडाच हवे तिकडे त्याला घेऊन जाईल. हे उदाहरण देऊन मौलाना स्पष्ट करतात की घोडा म्हणजे आपले मन आहे व जगातील प्रत्येक माणूस मनरूपी घोड्यावर स्वार असलेल्या घोडेस्वारासमान आहे. अर्थात आपण वासनारूपी चंचल घोड्यावर स्वार असलेल्या प्रवाशासमान आहोत. रोजांचा उद्देश हा आहे की वासनारूपी या घोड्याचा लगाम रोजेदाराच्या हाती यावा! रोजेदाराने वासनांची गुलामी झिडकारून त्यांवर संपूर्ण नियंत्रण प्राप्त करावे.

वासनांची गुलामी ही संपूर्ण मानवजातीची गंभीर समस्या आहे, किंबहुना मूळ समस्या आहे. साऱ्या समस्यांचे मूळ कारण हीच वासनांची गुलामी आहे. वासनांवरील नियंत्रण सुटले की माणूस बेलगाम घोड्याप्रमाणे स्वैराचारी होतो. आजची तरुण पिढी व्यसनाधीन होत आहे. व्यभिचार, बलात्कार, अश्लीलता-नग्नता, भ्रष्ट आचार दिवसेंदिवस वाढत आहेत, याचे मूळ कारण वासनांची गुलामी नव्हे तर दुसरे काय आहे?

मात्र वासनांच्या गुलामीतून मुक्त होण्याचा अर्थ संसार सोडणे असा मुळीच नाही. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सोबत्यांना रमजान महिन्यात रात्री आपल्या पत्नींशी समागम करण्याबाबत संकोच वाटत होता. त्यामुळेच खुद्द कुरआनात स्पष्ट उल्लेख आहे,

"तुमच्यासाठी उपवासकाळात रात्री आपल्या पत्नींजवळ जाणे वैध आहे."

(दिव्य कुरआन-२:१८७)

इस्लामच्या दृष्टिकोनातून माणसाचे संपूर्ण जीवन 'इबादत' (उपासना) आहे. अर्थात संसार करणे, मुलाबाळांचे व माता-पित्यांचे संगोपन करणे, अर्थार्जन करणे, राजकारण इ. सर्व गोष्टी उपासनाच आहेत. अट फक्त ही आहे की हा सर्व संसार ईशआज्ञांच्या अधीन राहून करावा. इस्लाममध्ये संसार सोडणे वर्ज्य आहे.

रमजान महिना काही दिवसांवर येऊन ठेपलेला. आम्ही मस्जिदीसमोर

पाण्यासाठी बोअर घेतला. पाणीही भरपूर लागले. वीज कनेक्शनसाठी वीज बोर्डाकडे रीतसर अर्जही केला. आता ३-४ दिवसांनी रमजान सुरू होणार आहे, मात्र वीज कनेक्शन मिळेना! मस्जिदीत बैठक झाली.

एक गृहस्थ म्हणाले, "कनेक्शन नाही मिळाले तर आकडा टाका, आपण कनेक्शनसाठी अर्ज तर दिलाच आहे."

पण एक तरुण म्हणाला, "आकडा! अवैध, हरामाचं पाणी? दिवसभर रोजा ठेवायचा, अन्न-पाणी सोडायचं, नमाज-दुआ करायची आणि दिवसभराचा रोजा (उपवास) आकडा टाकून उपसलेल्या अर्थात हरामाचे पाणी पिऊन सोडायचा? हे कदापि रास्त नव्हे!"

आम्ही सर्व वीज बोर्डात गेलो. साहेब मुस्लिम नव्हे, मराठा समाजाचे होते. त्यांना मी त्या तरुणआचे मनोगत सांगितले व कनेक्शन देण्याची विनंती केली. साहेब भारावून गेले व आम्हा सर्वांना अत्यंत आदराने चहा-पाणी केला. दुसऱ्याच दिवशी त्यांनी आम्हाला अधिकृत कनेक्शन दिले. माणसाच्या आचारविचारात व दैनंदिन जीवनात परिवर्तन घडावे व त्याचे उभे जीवन ईशभीरूतेने उजळून जावे हाच रोजांचा वास्तविक उद्देश आहे. चारित्र्यसंवर्धन हाच रोजांचा मूळ उद्देश आहे. मात्र अज्ञानामुळे रोजांचा संबंध केवळ अन्न-पाणी सोडण्यापुरताच मर्यादित असल्याचे समाजमनात प्रचलित आहे.

रमजान महिन्यात रोजेदारांचा रोजा इफ्तार करविण्यासाठी प्रत्येकजण आपल्या परीने प्रयत्न करीत असतो. रोजेदाराचा रोजा इफ्तार करविणाऱ्यालाही रोजेदाराएवढेच पुण्य लाभते ही सद्‌भावना त्यामागे असते. म्हणूनच रमजानमध्ये इफ्तार पार्ट्यांची रेलचेल दिसते. त्यामुळेच रमजानमध्ये संपूर्ण जगभरात फळांची मागणीही वाढते आणि फळांना भावही चांगला मिळतो.

महाराष्ट्रातही अनेक फळबागावाले आपली फळे रमजान महिन्यात परिपक्व होऊन बाजारात जातील असे नियोजन करतात.

रोजांसंबंधी पैगंबरकालीन एक घटना खूप बोलकी आहे. मदीना शहरातील मस्जिदीत पैगंबर मुहम्मद (स.) उपस्थित असताना दोन रोजेदार नमाजसाठी आले. त्यांनी वुजू (नमाजपूर्वी तोंड, हात, पाय धुण्याचा विधी)

करून नमाज अदा केली व जाऊ लागले. पैगंबरांनी त्यांना बोलावून पुन्हा वुजू व नमाज अदा करण्याची व त्या दिवशीचा रोजा ईदनंतर पुन्हा ठेवण्याची आज्ञा दिली.

त्या उभयतांनी वुजू, नमाज व रोजाही पुन्हा ठेवण्याचे कारण विचारल्यावर पैगंबर मुहम्मद (स.) त्यांना म्हणाले, "मस्जिदीत प्रवेश करताना तुम्ही दोघे अमूक व्यक्तीची निंदानालस्ती करीत होता, हे खरे ना! त्यामुळेच तुमची नमाज आणि रोजा व्यर्थ ठरला."

निंदानालस्ती तर आज सामान्यांच्या जिव्हाळ्याचा विषय बनला आहे. सामान्यच काय मोठमोठ्या प्रतिष्ठितांनाही इतरांची निंदानालस्ती केल्याशिवाय करमत नाही. मात्र हीच निंदानालस्ती माणसाच्या सर्वनाशास कारणीभूत ठरते, याचे त्यांना भान नसते.

"कुणाच्या पाठीमागे त्याची निंदानालस्ती करणे हे आपल्या सख्ख्या मृत भावाचे मांस खाण्याइतके नीच कृत्य आहे." (दिव्य कुरआन)

म्हणूनच काही कार्यकर्त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांना प्रश्न केला, "एखाद्या व्यक्तीमध्ये खरेच जर एखादा दुर्गुण असेल आणि त्याच्यामागे जर आम्ही त्याची चर्चा केली तर ती निंदानालस्ती आहे का?" पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उत्तर दिले, "होय! हीच निंदानालस्ती आहे. तो दुर्गुण त्या व्यक्तीत नसतानाही जर ती व्यक्ती तशी आहे, अशी चर्चा तुम्ही केली तर हा तर निंदानालस्तीपेक्षाही घोर अपराध व खोटारडा आक्षेप होय."

कुणाच्या अनुपस्थितीत त्याच्याविषयी बरी-वाईट चर्चा करणे भयंकर दुष्कृत्य आहे, घोर अपराध आहे. इस्लामची भूमिका ही आहे की कुणाविषयी काही शंकाकुशंका असेल, चर्चाच करायची असेल तर प्रत्यक्ष त्याच्या समोर आणि सद्भावनेने करावी. निंदानालस्तीमुळे, लावालावीमुळे माणसे तुटतात! सामाजिक ऐक्य व बंधुभावास तडा जातो. मात्र दुर्दैवाने, सद्य:परिस्थिती अशी आहे की दोन कार्यकर्ते जर भेटले तर इतरांची निंदानालस्ती केल्याशिवाय त्यांचे समाधानच होत नाही!

रोजा ठेवणाऱ्यांना पैगंबर मुहम्मद (स.) यांनी निंदानालस्तीविषयी

ताकीद केली आहे, "खबरदार! या भयंकर दुष्कृत्यापासून सावध राहा! अन्यथा तुमची नमाज, रोजा व इतर सारी सत्कृत्ये व्यर्थ ठरतील."

किती महान आहे हा रोजांचा उद्देश! रोजांचे हे वास्तव ठाऊक नसल्यामुळे लोकांचा गैरसमज आहे की केवळ अन्न-पाणी व चहा इ.मुळेच रोजा मोडतो. डोळ्यांचा रोजा, वाचेचा रोजा, कानांचा रोजा व हातापायांचा रोजा बहुतेकांच्या ध्यानीमनी पण नसतो, हे कदापि योग्य नव्हे.

नमाज व रोजांप्रमाणेच कुरआनात 'जकात'ही अनिवार्य ठरविली आहे. म्हणूनच समस्त मुस्लिम बांधव रमजान महिन्यात आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार 'जकात'ही अदा करतात. आपल्या कमाईतून सर्व आवश्यक खर्च वजा जाता वर्षाकाठी जर साडेसात तोळे सोने अथवा ५२ तोळे चांदी अथवा तत्सम रोख रक्कम शिल्लक असेल, तर त्यावर २.५ (अडीच) टक्क्यानुसार जकात अनिवार्य आहे. पैगबरकाळात व त्यांच्या पश्चात खलीफांच्या राजवटीत जकातसाठी एक विशेष खाते (विभाग) असे. वसुली अधिकारी असत व गरजूंपर्यंत ती जकात पोहचविण्याचेही नियोजन असे. आता मात्र तशी शासकीय व्यवस्था नसल्यामुळे लोक आपापल्या पातळीवर जकात अदा करतात. मात्र नमाज जशी सामुदायिकरीत्या अदा केली जाते, तद्वतच जकातचेही सामुदायिक नियोजन करण्यालाच प्राधान्य देणे योग्य आहे. प्रत्येक गावात, शहरात मुस्लिम बांधवांनी बैतुलमालची निर्मिती करून त्यात आपली जकात जमा करावी व गरजूंपर्यंत पोहचविण्याचे नियोजन करावे. त्यामुळे व्यापक प्रमाणात गरजूंची सेवा घडेल.

जकातचे महत्त्व पैगंबरकालीन एका घटनेवरून स्पष्ट होते. एकदा दोन स्त्रिया काही कारणास्तव पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे आल्या. त्यांच्या हातातील सोन्याच्या बांगड्या (कंगन) पाहून पैगंबरांनी त्यांना विचारले, "तुम्ही या बांगड्यांची जकात अदा केली किंवा कसे?"

त्या स्त्रियांनी उत्तर दिले, "नाही! आम्ही यांची जकात अदा केली नाही."

त्यावर पैगंबर (स.) त्यांना म्हणाले, "काय तुम्हाला हे आवडेल की कयामतच्या दिवशी मरणोत्तर जीवनात तुमच्या हातात अग्नीच्या बांगड्या

असाव्यात?"

त्या भगिनी म्हणाल्या, "कदापि नाही, हे पैगंबर (स.)!"

यावर पैगंबरांनी त्यांना आदेश दिला, "मग जा, सोन्याच्या बांगड्यांची जकात अदा करा."

ऐहिक जीवनात जर कोणी आपल्या संपत्तीची जकात देत नसेल तर ते धन मरणोत्तर जीवनात अग्नी बनून त्या धन्याला जाळत राहील अर्थात त्या धनाच्या आगीत तो होरपळत राहील. ही पैगंबरांची व कुरआनची शिकवण प्रत्येक मुस्लिमाला जकात अदा करण्यावर प्रवृत्त करते. जकातचा अर्थ- 'शुद्ध करणे', 'पवित्र करणे' असाही होतो. 'जकात दिल्यामुळे धनवानाचे धन शुद्ध व पवित्र होते' असाही संकेत जकात या शब्दात आहे.

एकीकडे कुरआनने जकात अनिवार्य ठरविली आहे तर दुसरीकडे व्याज निषिद्ध (हराम) ठरविली आहे. सावकारकी, व्याजाधिष्ठित व्यवहार अवैध ठरविले आहेत. व्याज घेणे व देणे आणि व्याजाशी संबंधित कुठलेही काम करणे निषिद्ध आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) म्हणतात, "व्याज घेणाऱ्याचा व देणाऱ्याचा अल्लाह धिक्कार करतो."

व्याज हा अर्थव्यवस्थेमध्ये कॅन्सरसमान रोग आहे. आज लाखो शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे मूळ कारण हीच सावकारकी व व्याजावर व्याज - चक्रवाढ व्याज आकारणारी अर्थव्यवस्था आहे. म्हणूनच सध्या जगभरातील अनेक अर्थतज्ञ व्याजमुक्त अर्थव्यवस्थेचा विचार करत आहेत. जगात अनेक ठिकाणी व्याजमुक्त बँका कार्यरत आहेत.

प्रसिद्ध भारतीय अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव स्वत: आखातातील व्याजमुक्त बँकांचे डायरेक्टर आहेत. एका भेटीदरम्यान ते स्वत: म्हणाले, "भारताला अशा व्याजमुक्त बँकींग व्यवस्थेची नितांत गरज आहे."

जमाअत-ए-इस्लामी हिंद ही संघटना देशामध्ये अशा प्रकारच्या व्याजमुक्त बँक व सोसायट्या व्यापक प्रमाणावर निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. यात जर यश मिळाले तर कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या समस्या निश्चितपणे

काही अंशी का होईना दूर होतील व आत्महत्यांचे प्रमाणही घटेल.

'सदक-ए-फित्र' रमजानचे खास वैशिष्ट्य आहे. खरे तर 'रमजान ईद'चे शास्त्रोक्त नाव 'ईदुल फित्र' असे आहे. अर्थात- ती ईद जी साजरी करण्यापूर्वी 'फित्र' नावाचे दान करणे अनिवार्य आहे. साधारणत: सधन कुटुंबातील लहान-थोर अशा प्रत्येक व्यक्तीतर्फे प्रत्येकी २.५ किलो धान्य ईदगाहवर जाण्यापूर्वी गोरगरीबांना द्यावे व नंतरच ईद साजरी करावी, असे संकेत आहेत.

म्हणूनच पैगंबर मुहम्मद (स.) यांचा आदेश आहे, "ऐपत असूनही जो 'सदक-ए-फित्र' देत नाही, त्याने ईदगाहच्या जवळपासही फिरकू नये."

शरियतनुसार ज्यांच्यावर जकात अनिवार्य आहे त्यांच्यावर 'सदक-ए-फित्र'सुद्धा अनिवार्य आहे. एखाद्या शहरामध्ये १० हजार मुस्लिम कुटुंबे असतील आणि त्यातील चार हजार कुटुंबे सधन असतील, तर त्यांनी आपले 'फित्र'चे दान सामूहिकपणे अदा करावे. प्रत्येक कुटुंबात आबालवृद्ध अशा एकंदर ५ व्यक्ती गृहीत धरल्या तर ४००० कुटुंबे × ५ व्यक्ती × २.५ कि.ग्रॅ. = ५०,००० कि.ग्रॅ. धान्य एकत्रित होईल व समाजातील दीनदुबळ्या कुटुंबांमध्ये ते वितरीत करण्यात येईल अथवा रमजान कीट (खजूर, खोबरे, बदाम इ.) च्या स्वरूपातही देता येईल. त्यामुळे रमजान ईदच्या आनंदात गोरगरीबांना आनंदाने सहभागी होता येते.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी म्हटले आहे, "ऐपत असूनही 'फित्र'चे दान देणार नाही त्याचे रमजानचे रोजे, नमाज इ. सर्व उपासना अल्लाह स्वीकारणारच नाही."

अर्थात- "माझ्या रोजांचा व नमाजींचा अल्लाहने स्वीकार करावा यासाठी मी हे फित्र अदा करत आहे" ही भावना रोजेदाराच्या मनात असते. म्हणजे "सदक-ए-फित्र ही गरीबांची सेवा म्हणून नव्हे तर माझ्या उपासनांचे सार्थक करण्यासाठी असून ती माझी गरज आहे" ही भावना त्याच्या मनात असते. अशा प्रकारे आपल्या देशातील १५ ते २० कोटी मुस्लिमांपैकी ५ कोटी बांधव जरी सधन असतील तर ते एक लाख पंचवीस हजार क्विंटल धान्य दर रमजान ईदपूर्वी समाजात गरजूंमध्ये वितरीत करतात. जकातची रक्कम

याहून वेगळी आहे. म्हणूनच रमजान ईदला 'ईदुलफित्र' व 'दानोत्सव' म्हणूनही संबोधले जाते.

रमजान महिन्याच्या शेवटच्या दहा दिवसांपैकी विषम तारखांच्या रात्रींना विशेष महत्त्व आहे. महत्त्व आहे. म्हणजेच २१, २३, २५, २७ व २९ या त्या पाच रात्री आहेत. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर पवित्र कुरआनच्या अवतरणाची सुरूवात रमजान महिन्याच्या 'लैलतुल कद्र' या रात्री झाली. ती रात्र वरील पाच रात्रींपैकी एक असते, असे संकेत पैगंबरांनी दिले आहेत. म्हणूनच जगातील समस्त मुस्लिम बांधव या रात्रींमध्ये जागरण करतात (जागरणाची रात्र) व अधिकाधिक उपासना (कुरआन पठण, ईशस्मरण, नमाज, प्रवचन इ.) करण्याचा प्रयत्न करतात. या पवित्र रात्रींमध्ये केलेली प्रार्थना व अल्लाहजवळ मागितलेली दुआ अल्लाह जरूर कबूल करतो, अशी मुस्लिम बांधवांची धारणा आहे.

रमजानच्या या शेवटच्या पाच विषम रात्रींमध्ये समस्त मुस्लिम बांधव अत्यंत तळमळीने आपल्या तमाम अपराधांबद्दल क्षमेची याचना करतात, मृत्यूचे स्मरण करतात, मरणोत्तर जीवनातील यशासाठी साश्रु नयनांनी दुआ करतात. आपल्या मातापित्यांसाठी, मुलेबाळे, आप्तेष्टांसाठी तद्वतच समस्त मानवजातीच्या कल्याणासाठी प्रार्थना करतात.

"आपल्या अपराधांबद्दल अंत:करणापासून क्षमा मागणाऱ्यांना अल्लाह जरूर माफ करतो," असे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे वचन आहे. यासंबंधी पैगंबरांचा एक उद्देश फार महत्त्वाचा आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) म्हणतात की वाळवंटातील एक प्रवासी थकल्याने एके ठिकाणी थोडा वेळ विश्रांतीसाठी थांबलेला आहे. त्याचे सामान उंटावरच लादलेले आहे. त्याचा डोळा लागतो. थोड्या वेळाने तो जागा होतो आणि पाहतो तर त्याचा उंट त्याच्या अन्न-पाणी व सर्व सामानासह गायब! तो प्रवासी चिंताग्रस्त होतो. सगळीकडे उंटाचा शोध घेतो. मात्र उंट कुठेच सापडत नाही. आता आपणास या वाळवंटात अन्न-पाण्याविना मृत्यूला सामोरे जावे लागणार या चिंतेने निराश होऊन तो पुन्हा त्याच ठिकाणी येतो व त्याला पुन्हा झोप लागते. काही वेळाने

तो जागा होतो आणि पाहतो तो काय आश्चर्य! त्याचा हरवलेला उंट त्याच्या सर्व सामानासहीत समोर उभा आहे. त्याचे सामानही सुरक्षित आहे. त्याच्या आनंदाला सीमाच राहात नाही. या पराकोटीच्या आनंदात तो उद्‌गारतो, "हे अल्लाह! हे माझ्या दासा! मी तुझा स्वामी!"

पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, "या पराकोटीच्या आनंदात तो काय बरळतोय याचेसुद्धा त्याला भान नाही. अल्लाहला आपला बंदा (दास) संबोधतोय, स्वत:ला अल्लाहचा मालक संबोधतोय! किती पराकोटीचा आनंद!"

पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, "जेव्हा एखादा मार्गभ्रष्ट माणूस क्षमायाचना करून अल्लाहकडे येतो व सन्मार्ग स्वीकारतो, तेव्हा अल्लाहला त्या प्रवाशापेक्षाही अधिक आनंद होतो."

माणसे जीवनात चुकतातच. ते माणसाच्या स्वभावातच आहे. पण आपली चूक लक्षात आल्यावर तिची दुरुस्ती करणे व पुढे रास्त मार्ग स्वीकारणे यातच माणसाचे श्रेष्ठत्व व शहाणपण आहे. इतिहासात असे अगणित दाखले आहेत. दुष्ट, लोभी, दुटप्पी लोकांचेही मनपरिवर्तन झाले, आज त्यांचा समावेश अत्यंत महान अशा विभूतींमध्ये केला जातो. खुद्द पैगंबर मुहम्मद (स.) यांना ठार करण्यासाठी हाती नंगी तलवार घेऊन निघालेला उमर वाटेतच बहिणीच्या घरी कुरआनच्या काही आयती ऐकतो आणि पैगंबरांचा हा हाडाचा वैरी ईमान धारण करून जीवलग सहकारी होतो. आज समस्त मुस्लिम जगतामध्ये माननीय उमर (र.) यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. पैगंबरांच्या पश्चात ते तत्कालीन इस्लामी राष्ट्राचे खलीफा (राष्ट्राध्यक्ष) झाले.

अल्लाहने प्रत्येक व्यक्तीसाठी ही सावरण्याची संधी शेवटपर्यंत बहाल केलेली आहे. ज्या क्षणी माणूस जीवनासंबंधी गांभीर्याने विचार करील, सत्याची कास धरील व सन्मागावर येईल तर त्याच्या पूर्व गुणदोषांबद्दल त्याला अल्लाह क्षमा करील, ही हमी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दिली आहे. दिव्य कुरआनातही असे दाखले आहेत. हे जीवन माणसासाठी एक परीक्षाच आहे. येथे प्रत्येकाला मृत्यू अटळ आहे आणि शेवटी त्याची गाठ अल्लाहशीच आहे. प्रत्येकाला मृत्युपश्चात एके दिवशी आपल्या संपूर्ण जीवनासंबंधी जाब द्यावाच लागेल. अल्लाहच्या आणि पैगंबरांच्या आज्ञापालनातच शाश्वत यश आहे. हे महान

सत्य जेव्हा माणूस स्वीकारतो व आपल्या आचारविचारात परिवर्तन घडवून आणतो, तेव्हाच तो खऱ्या अर्थाने जीवनाचे सार्थक करतो.

रमजान महिन्याची सांगता 'ईद' अर्थात 'ईदुल फित्र' साजरी करून होते. साधारणत: शहराच्या बाहेर ईदगाहच्या प्रशस्त मैदानात समस्त आबालवृद्ध व शक्य आहे तेथे पुरुषांबरोलबरच स्त्रिया व मुलीही ईदच्या नमाजसाठी अत्यंत आत्मीयतेने व मनोभावे एकत्र जमतात. ईदगाहवर जाताना स्नान करून, सुगंध व सुरमा लावून एकत्रितपणे सर्व जण अल्लाहचे गुणगान करतात. ईदगाहवर सामुदायिकरीत्या अत्यंत शिस्तबद्धपणे नमाज अदा केली जाते. नमाजनंतर मौलाना समस्त उपस्थितांसमोर प्रबोधनबपर प्रवचन (खुत्बा) करतात. प्रवचनामध्ये रमजान, रोजा, कुरआन, विश्वबंधुत्व, आदर्श समाजनिर्मिती व समाजाला भेडसावणाऱ्या समस्या व त्यांच्या निराकरणासंबंधी यथायोग्य मार्गदर्शन करतात. अशा प्रकारे ईदची नमाज अदा करून सर्व मुस्लिम बांधव अत्यंत आनंदाने आपापल्या घरी येतात व एकमेकांना शुभेच्छा देतात. शिरखुर्म्याचा आस्वाद घेतात. ईदच्या आनंदामध्ये आपल्या सर्वधर्मीय मित्र-आप्तेष्टांना सहभागी करून घेतात. शेजाऱ्यांनाही स्नेहपूर्वक निमंत्रण देतात. संपूर्ण समाजात प्रेमाचे, बंधुभावाचे वातावरण निर्माण होते.

'जमाअत-ए-इस्लामी हिंद'चे कार्यकर्ते खासकरून आपल्या देशबांधवांसाठी 'ईद-मिलना'चे कार्यक्रम आयोजित करतात. शीरखुर्म्याचा गोड आस्वाद तर असतोच, पण त्याबरोबरच इस्लाम, ईद, कुरआन, रोजा इत्यादी विषयांवर प्रबोधनही करतात. तद्वतच आपल्या इतरधर्मीय बांधवांना मराठीतून दिव्य कुरआन, पैगंबर चरित्र व इस्लामशी निगडित पुस्तके सप्रेम भेट देतात. या सर्व उपक्रमांचा एकमात्र उद्देश हाच असतो की देशबांधवांना खऱ्या इस्लामचे दर्शन व्हावे, इस्लाम व मुस्लिमांसंबंधी असलेल्या अनेक शंकाकुशंकांचे निराकरण व्हावे.

देशामध्ये व समाजात शांती, सद्भावना, बंधुभाव व परस्पर प्रेम निर्माण करण्यासाठी अशा 'ईद-मिलन'सारख्या कार्यक्रमांची नितांत गरज आहे, अशी भावना सदर कार्यक्रमांत सहभागी असणारे सर्वधर्मीय मान्यवर व्यक्त करतात. अल्लाहच्या कृपेने अलीकडच्या काळात सर्वधर्मीय सुज्ञ बंधु-भगिनी ईद-

मिलनच्या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊ लागले आहेत. 'इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट, मुंबई'ने प्रकाशित केलेल्या जवळपास अडीचशेहून अधिक विविध विषयांवरील मराठी भाषेतील इस्लामी पुस्तकांची मागणीही प्रचंड वाढली आहे.

अनेक विद्वान स्वतः दिव्य कुरआन (मराठी भाषांतर) व इतर इस्लामी पुस्तकांचा प्रसार देशबांधवांमध्ये करत आहेत. अशा परस्पर मीलनाच्या कार्यात आपण सर्वांनी मनोभावे सहभाग घेतला तर स्वातंत्र्य, समता, बंधुभाव व न्यायाधिष्ठित समाज निर्माण करण्याचे आपल्या महापुरुषांचे स्वप्न साकार झाल्याशिवाय राहणार नाही. ज्या दिवशी हे स्वप्न साकार होईल, तोच दिवस समस्त देशवासीयांसाठी खरा ईदचा दिवस असेल. आदर्श भारत घडविण्याचे हे स्वप्न साकार होवो व या उदात्त ध्येयासाठी आपणा सर्वांना सहकार्याची सद्‌बुद्धी लाभो, हीच अल्लाहजवळ अंतःकरणपूर्वक दुआ!

-०- समाप्त -०-